सकाळ



# रामनवमीच्या पहाटे रंगणार गीतरामायण

## 'सकाळ'चे आयोजन : १७ एप्रिलला बंधन लॉनवर कार्यक्रम

■ सकाळ वृत्तसेवा

अमरावती, ता. ११ : काव्य नव्हे, हे अमृतसंचय, अशा शब्दांत ज्याचे वर्णन केले जाते, ते ग. दि. माडगूळकर यांच्या सिद्धहस्त लेखणीतून लिहिले गेलेले व संगीतकार सुधीर फडके यांनी स्वरबद्ध केलेले गीतरामायण यंदाही सकाळ माध्यम समूहाच्या वतीने रामनवमीला बुधवार १७ एप्रिल रोजी आयोजित करण्यात आले आहे.

सौरऊर्जेच्या क्षेत्रात अमरावतीचे नाव देशभरात पोहोचविणाऱ्या अमित आरोकर यांची ईसीई इंडिया तसेच प्रख्यात समाजसेवक चंद्रकुमार उपाख्य लप्पीभय्या जाजोदिया यांच्या मधुसूदन ग्रुपचे सहकार्य या सोहळ्याला लाभले आहे. हॉटेल ग्रॅण्ड महफीलचे संचालक अमर बालकृष्णन् व गोपाल मुंधडा यांचे या कार्यक्रमाला विशेष सहकार्य आहे.

बुधवारी (ता.१७) पहाटे ५.१५ वाजता कॅम्प परिसरातील हॉटेल ग्रॅण्ड महफीलच्या बंधन लॉनवर हा अलौकिक स्वर व नृत्याविष्कार सोहळा अमरावतीकरांना अनुभवायला मिळणार आहे.

ओघवत्या शैलीत गदिमांनी शब्दबद्ध केलेली रामकथा आणि सुधीर फडके यांनी आशयानुरूप दिलेल्या चाली, असे गीतरामायण पुणे आकाशवाणी केंद्रावरून प्रसारित झाले होते. २००७ मध्ये गीतरामायणाला ५० वर्षे पूर्ण झाली. याच सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्ताने 'सकाळ'ने दरवर्षी रामनवमीच्या पहाटे गीतरामायण नावाच्या अद्वितीय कार्यक्रमाला सुरुवात केली. या आयोजनाचे यंदाचे हे सोळावे वर्ष आहे. अमरावतीकरांनी या सोहळ्याचा आस्वाद घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

### आशयगर्भ गीतांमधून रामकथा

स्वये श्री रामप्रभू ऐकती... सरयू तीरावरी अयोध्या... दशरथा घे हे पायसदान... राम जन्मला ग सखी... स्वयंवर झाले सीतेचे... मोडू नको वचनास... जय गंगे भागीरथी... माता न तू वैरिणी... सेतू बांधा रे... भूवरी रावण वध झाला... अशा आशयगर्भ गीतांमधून रामकथा मांडलेले व अवघी भारतीय संस्कृती समरसात भिजून टाकणारे गीतरामायण अमरावतीकरांच्या हृदयात परत एकदा घर करणार आहे.

सकाळ

# रामनवमीच्या पहाटे रंगणार गीतरामायण

## 'सकाळ'चे आयोजन : १७ एप्रिलला बंधन लॉनवर सोहळा



ECE INDIA | MADHUSUDAN GROUP | VIJAYA SCHOOL FOR EXCELLENCE | THE GRAND MEHFIL passion for excellence

■ 'सकाळ वृत्तसेवा

अमरावती, ता. १४ : काव्य नव्हे, हे अमृतसंचय, अशा शब्दांत ज्याचे वर्णन केले जाते, ते ग. दि. माडगूळकर यांच्या सिद्धहस्त लेखणीतून लिहिले गेलेले व संगीतकार सुधीर फडके यांनी स्वरबद्ध केलेले गीतरामायण यंदाही सकाळ माध्यम समूहाच्या वतीने रामनवमीला बुधवार १७ एप्रिल रोजी आयोजित करण्यात आले आहे.

बुधवारी (ता.१७) पहाटे ५.१५ वाजता कॅम्प परिसरातील हॉटेल ग्रॅण्ड महफीलच्या बंधन लॉनवर हा अलौकिक स्वर व नृत्याविष्कार सोहळा अमरावतीकरांना अनुभवायला मिळणार आहे.

सौरऊर्जेच्या क्षेत्रात अमरावतीचे नाव देशभरात पोहोचविणाऱ्या अमित आरोकर यांची ईसीई इंडिया, प्रख्यात समाजसेवक चंद्रकुमार उपाख्य लप्पीभय्या जाजोदिया यांच्या मधुसूदन ग्रुप तसेच विजया स्कुल फॉर एक्सलन्सचे सहकार्य या सोहळ्याला लाभले आहे. हॉटेल ग्रॅण्ड महफिलचे संचालक अमर बालकृष्णन् व गोपाल मुंधडा यांचे या कार्यक्रमाला विशेष सहकार्य आहे.

डॉ. राजेश उमाळे व संच गीतरामायण, तर हेमंत नृत्यकला मंदिरची चमू गीतरामायणातील गीतांवर नृत्यकलाविष्कार सादर करणार आहेत. गीत, संगीत आणि नृत्याविष्कार, अशा या त्रिवेणी संगमाचे रसिक १७ एप्रिलला साक्षीदार होणार आहेत. गजलरत्न डॉ. राजेश उमाळे, आशुतोष देशपांडे, शीतल भट, गौरवी उमाळे, केतकी मोहदरकर हे कलावंत गाणी सादर करतील. तबल्यावर शीतल मांडवगडे आणि अजय महल्ले, सिंथेसायझरवर पंकज देशमुख, बासरीवर रवींद्र खंडारे तर ऑक्टोपॅडवर प्रशांत ठाकरे संगत करतील. गीतरामायणाचे निवेदन डॉ. मोना चिमोटे, अवंती मोरे आणि नितीन भट करतील.

ओघवत्या शैलीत गदिमांनी शब्दबद्ध केलेली रामकथा आणि सुधीर फडके यांनी आशयानुरूप दिलेल्या चाली, असे गीतरामायण पुणे आकाशवाणी केंद्रावरून प्रसारित झाले होते. २००७ मध्ये गीतरामायणाला ५० वर्षे पूर्ण झाली. याच सुवर्णमहोत्सवी वर्षनिमित्ताने 'सकाळ'ने दरवर्षी रामनवमीच्या पहाटे गीतरामायण नावाच्या अद्वितीय कार्यक्रमाला सुरवात केली. या आयोजनाचे यंदाचे हे सोळावे वर्ष आहे. अमरावतीकरांनी या सोहळ्याचा आस्वाद घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.